MHBU130024272023

रे.दि.मु.क्र. २१०/२०२३
तारामती –वि– जगन्नाथ

**आदेश निशाणी क्र. २८ वर**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी अर्जात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

०२. वादी सांगतात की, वादींनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी विरुद्ध दावा मालमत्तेची सरस–निरस वाटणी होणेसाठी तसेच स्वतंत्र ताबा मिळणेकामी अणि कायमचा मनाई हूकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीला त्यांचे दाव्यात प्रतिवादी क्र. २ नंतर प्रतिवादी क्र. ३ असे नमूद करायचे आहे. त्यानंतर जिल्हा बुलडाणा या मजकुरा नंतर ३ सौ. उमा राजु ढवळे, वय ३६ वर्षे, धंदा – गृहीणी रा. टाकरखेड, मु.ता. चिखली, जि. बुलडाणा असे नमुद करावयाचे आहे.

०३. असे की, वादींना त्यांचे नि.क्र. १ वरील दाव्याचे शिर्षकामध्ये पुढील प्रमाणे मजकूर नमुद करणे आहे. “प्रतिवादी नं. १ यांनी त्यांचे मृत्यूपूर्वी मु.मौजा टाकरखेड मुसलमान, ता.चिखली, जि. बुलडाणा येथील गट नंबर ३६ मधील एकुण क्षे. २हे. ७३ आर जमीनीपैकी ०.८१ आर शेत जमीनीचे कथीत खरेदीखत दस्त क्रमांक ५६४९/२०२३ नुसार दि. १३.०७.२०२३ रोजी केलेले खरेदीखत वादीचे हककावर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळणे करीता” तसेच विनंती कलमातील कलम क मधील बेदखल करु नये या शब्दानंतर दस्त क्र.५६४९/२०२३ नुसार दि. १३.०७.२०२३ रोजीचे बेकायदेशीर खरेदी खतानुसार या प्रतिवादींनी वादींना दावा मालमत्ते पासून व त्यांचे अधिकारापासून बेदखल करु नये असा प्रतिवादी विरुद्चा कायमचा मनाई हुकुम मिळावा" असा मजकुर नमुद करुन तशी दुरुस्ती करणे आहे. तसेच

परिच्छेद क्र. ७ मध्ये करु नये या शब्दानंतर "दस्त क्रमांक ५६४९/२०२३ नुसार दि. १३.०७.२०२३ रोजीचे" असा मजकुर नमूद करणे आहे.

०४. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी आपले म्हणणे सदर अर्जावर दिले नसल्यामुळे त्यांचे विरुद्ध विना म्हणणेचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

०५. प्रस्तुतचा दावा वादीने जाहीर सरस –निरस वाटणी होवून मिळणे करीता तसेच स्वतंत्र ताबा करीता जाहीर होवून मिळणे बाबत व कायमचा मनाई हुकूम मिळणे बाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाच्या कथनांच्या पृष्टर्थ वादी यांनी प्रतिज्ञालेख दिला आहे. तसेच प्रस्तुत दाव्यामध्ये पुरावा देण्यास सुरवात झालेली नाही. सदर अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे मूळ स्वरुप बदलणार नाही. तसेच दाव्यातील सर्व कथनांची सत्यता पुराव्याअंती ठरत असते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास दाव्यावर परिणाम होणार नाही. तसेच सबब, वादी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी विवेचनाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती विहित मुदतीत करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.01.21 11:10:48 +0530

दिनांक : १७.०१.२०२६

( श्रीमती एस .एच. उके.)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, चिखली.